# आपत्ती व्यवस्थापन आणि शिक्षण

**प्रा. डॉ. कांबळे गोविंदराव शंकरराव**
सहायक प्राध्यापक
आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन सातारा
**महाराष्ट्र भारत**

## प्रास्ताविक

पूर्वीच्या काळी निर्माण होणारी संकटे ही बरचशी नैसर्गिक स्वरूपाची असत. मानवाची जसजशी प्रगती होऊ लागली व तसेच तंत्रज्ञानाचा विकास होऊन जसजशी त्याच्या राहणीमानात सुधारणा होऊ लागली तसतशी संकटे कमी होण्याऐवजी वाढतच गेली प्रगती करून घेण्यासाठी मानवाने निसर्ग व्यवस्थेत जी ढवळाढवळ केली, त्याचाच हा परिणाम होय. जगामध्ये प्रचंड आपत्ती हया पूर्वीपासूनच घडत आहेत आणि भविष्यातही त्या घडत राहणारच. मानव जरी मोठया शर्थीन आपत्तीच्या संकटाशी सामना करत असला तरी त्याच्या या प्रयत्नांना हवे तसे यश अजून तरी प्राप्त झालेले नाही खरे तर सगळीकडे होणा—या अनियंत्रित प्रगतीमुळे ही समस्या अधिकच जटील बनली आहे.

### आपत्ती म्हणजे काय?

आपत्ती म्हणजे अशी घटना की ज्यामुळे अगदी आकस्मिकपणे प्रचंड जीवित हानी व अन्य प्रकारची हानी संभवते हे जरूरी नाही की प्रत्येक आपत्ती ही अचानकपणे उदभवते. आजच्या तंत्रज्ञानाने अशी बरीच साधने विकसित केली आहेत की, ज्याने संभवाणा—या आपत्तीचे पूर्वानुमान लावणे शक्य होते असे असले तरी अजूनही काही नैसर्गिक तसेच जवळ जवळ सर्व मानवनिर्मित आपत्तीचे अचूक अंदाज वर्तविणे शक्य झाले नाही. यामुळेच ब—याच आपत्ती हया अचानकपणेच उदभवतात. आपत्तीबाबत पूर्व सूचना जरी असली तरी तिचे अचूक स्थान व्याप्ती तसेच तीव्रता याबाबत पूर्वानुमान काढणे शक्य नसते आणि म्हणूनच प्रचंड हानी होते.

आपल्या समाजामध्ये असलेल्या जनजागृतीच्या अभावामुळे विकास आणि आपत्ती याचा असणारा परस्पर संबंध लोकांना माहीत नसतो. येथे ही वस्तुस्थिती जाणून घेणे गरजेचे आहे जेव्हा कधी पर्यावरणाचे महत्व जवळून विकास करण्याचे प्रयत्न केले जातात तेव्हा आपत्ती ही तिचे आक्राळ विक्राळ रूप घेउनच आपल्यापुढे उभीराहते. आपत्ती या ओढवणारच त्या ओढवू नयेत यासाठी प्रत्येकानेच सावधगिरी घ्यायला हवी आाणि जर अशा आपत्ती ओढवल्या तर त्याचा प्रतिकार करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आपत्ती कधीही येउ शकतात. त्या नियोजित नसतात परंतु योजनाबध्द प्रयत्नांनी त्यांचे निवारण होउ शकते. संकटे ही आधी येतात, त्यांची कारणे नैसगिक किंवा मानवनिर्मित असतात. त्यांच्या निवारणासाठी धडपड करणे ही प्रतिक्रियात्मक स्वरूपाची घटना आहे.

जेव्हा आपण देशाच्या राज्यघटनेचा विचार करतो, तेव्हा प्रत्येक व्यक्तीने सुरक्षितता जगण्याचा अधिकार व राष्ट्रीय एकात्मता या संदर्भात कटिबध्द राहण्याची आपण घेतलेली शपथ त्यात नोंदविलेली आहे. प्रत्येकास जीवित आणि मालमत्ता सुरक्षित राखण्याचा अधिकार घटनेनेच दिला आहे. तर त्या संदर्भातील संरक्षण शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याची जबाबदारी शासनाची आहे तसेच राष्ट्रीय एकात्मता आणि सुरक्षितता राखणे हे प्रत्येक व्यक्तीचे मूलभूत कर्तव्य आहे.

### व्याख्या

१. जागतिक आरोग्य संघटना

‘‘ ज्यामुळे हानी होते नैसर्गिक विपत्ती मानवी जीवांची हानी खालावणारे आरोग्यमान आणि आरोग्य सेवा हे सर्व इतक्या प्रमाणवर होते की जेणेकरून त्या जागे बाहेरील जगताकडून संकट ग्रस्तांकडे मदतीचा ओघ होतो.

२ आपत्ती म्हणजे अशी घटना की ज्यामुळे अगदी आकस्मिकपणे प्रचंड जीवितहानी व अन्य प्रकारची हानी संभवते

३ बाहेरील मदतीची आवश्यता भासण्याइतपत तीव्रता असणारी नैसर्गिक बाब म्हणजे आपत्ती होय.

### आपत्तीचे प्रकार व कारणे

आपत्ती विविध प्रकारच्या आहेत. या प्रकारांचा विचार करताना या आपत्तीचे दोन विभागांत विभाजन करता येते

**गट अ** १ मानवनिर्मित

२ निसर्गनिर्मित

**गट ब** १ भौगोलिक आपत्ती

२ पर्यावरणीय आपत्ती

३ निष्काळजीपणामुळे उदभवलेली आपत्ती

४ अतिरेकी व कलहामुळे घडलेली आपत्ती

गट अ

**आपत्तीचे प्रकार**

मानवनिर्मित आपत्ती | निसर्गनिर्मित आपत्ती

अपघात स्फोट, प्रदेश ओसाड होणे, अतिवृष्टी,भूकंप,ज्वालामुखी

अण्वस्त्राचे स्फोट जागतिक तापमान वाढ | पूर, भूस्खलन उल्कापात

ओझोनचा क्षय, जंगलातील वणवे उत्सवातील दुर्घटना. | त्सुनामी, वादळे, हिमपात व अवर्षण

गट ब

**आपत्तीचे प्रकार**

भौगोलिक | पर्यावरणीय | निष्काळजीपणामुळे उदभवलेली | अतिरेकीवकलहामुळे उदभवलेले

भूकंप पूर जंगलातील वणवे प्रदेश ओसाड होणे

ज्वालामुखी त्सुनामी अपघात अण्वस्त्राचे स्फोट

भूस्खलन वादळे वाळवंटीकरण उत्सावातील दुर्घटना

उल्कापातहिमवादळे ओझोन क्षय

हिमपात जागतिक तापमान अवर्षण




**आपत्ती व्यवस्थापन पाय—या**

१ आपतीपूर्वी व्यवस्थापन

२ आपत्ती झाल्याबरोबर लगेच करावयाचे व्यवस्थापन

३ आपत्ती नंतर दीर्घकालीन व्यवस्थापन

**आपत्ती व्यवस्थापन व शिक्षण आणि शिक्षकांची भूमिका**

यापूर्वी आपत्ती व्यवस्थापनाच्या संदर्भात शिक्षण संस्थाचा विचार केला गेलेला नव्हता. त्यातील विद्यार्थ्यांच्या व इतरांच्या सुरक्षिततेचा विचार करण्याची गरज निर्माण झाली ती कुंभकोण्म शहरातील शाळेत झालेल्या आगीच्या दुर्घटनेनंतर, शाळांच्या इमारती कोठे असाव्यात त्यांचा आकार कसा कसावा सुरक्षिततेच्या दृष्टिने त्या कशा बांधाव्यात त्यामध्येअन्य सोई—सुविधा कशा असाव्यात या संदर्भातील ज्ञान त्या शाळेशी संबंधित व्यक्तींना असणे आवश्यक आहे. मुख्याध्यापक, शिक्षक व अन्य कर्मचारी यांना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी कोणती सावधगिरी बाळगावी विविध आपत्तींना कसे तोंड द्यावे वगैरे गोष्टीचे ज्ञान शिक्षणसंस्थांमध्ये दिले जाणे महत्वाचे आहे. तसेच शालेय अभ्यासक्रमातही आज आपत्ती व्यवस्थपनाचा समावेश करणे आवश्यक आहे या दृष्टीने आपली व्यवस्थापनातील शिक्षण आणि मुख्याध्यापक यांची भूमिका जाणून घेणे आवश्यक आहे.

**मुख्याध्यापकाची भूमिका**

१. आपल्या शाळेमध्ये आपत्ती व्यवस्थापनाबाबत कोणती योजना बनवली आहे व त्यांचा अवलंब केला आहे किंवा नाही याची पडताळणी करणे व त्याचा अवलंब करणे.

२. मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा आपत्ती निवारणसाठी एक गट बनवावा.

३. मुख्याध्यापकांनी गट प्रमुखाची भूमिका बजावत असताना गटातील सर्वांना विविध प्रकारच्या आपतीबाबत घ्यायची दक्षता आपत्ती प्रसंगी करायची कामे व आपदग्रस्तांचे पुनर्वसन याबाबत संपूर्ण शिक्षण द्यावे.

४. आपल्या शाळेत आपत्ती व्यवस्थापनासंदर्भातील सर्व सुविधा उपलब्ध करून देणे उदा. अग्निशमन टाक्या, पाण्याचे हौद बनवून घेणे

५. इमारतीतून बाहेर पडण्यासाठी अनेक दरवाजे ठेवणे

६. काही परिस्थितीत विद्यार्थ्यांना शाळेतच ठेवून घेणे

७. जाळपोळ, दंगल, दगडफेक, अशा घटना बाहेर घडत असतील तर अशा वेळी मुलांच्या खाण्यापिण्याची सोय करून पालकांना मुले सुरक्षित असल्याचे कळविणे

८. आपत्ती व्यवस्थापनाचे योग्य ते शिक्षण विद्यार्थी व शिक्षकांना देण्याची व्यवस्था करावी.

**शिक्षकाची भूमिका**

१. शिक्षकाने व्यवस्थापनाचे गुण अंगी बाणवून आपत्ती व्यवस्थापनामध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावली पाहिजे विविध आपत्तीची माहिती करून घेऊन आपत्ती पूर्व आपत्तीची माहिती करून घेउन आपत्तीपूर्व आपत्ती झाल्यानंतर करावयाच्या व्यवस्थापनासंदर्भात प्रशिक्षण घेतले पाहिजे.

२. स्वत: आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घेऊन इतरांना देखील आपत्ती व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने योग्य ते निर्देष देणे

३. शिक्षक हा केवळ विद्यार्थ्यांनचा मार्गदर्शन नसतो तर समाजातील इतर व्यक्तीना देखील मार्गदर्शन करण्याचे कार्य त्याला करावे लागते अशा वेळी आपत्ती व्यवस्थापनाची गरज लक्षात घेऊन योग्य त्या मार्गदर्शनाचे कार्य शिक्षकांनी केले पाहिजे

४. ज्या ठिकाणी आपत्ती उदभवल्या असतील त्या ठिकाणी स्वत: जाऊन आपदग्रस्तांना मदत करणे त्यांना प्रथमोपचार उपलब्ध करून देणे

५. समाजाचा जबाबदार घटक म्हणून त्यांनी आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे.

६. शाळा तसेच समाजामध्ये वेगवेळया कार्यशाळा राबवून त्याने आपत्तीच्या परिणामाविषयी उद्‌बोधन करणे

**समारोप—**

आपत्ती व्यवस्थापन शालेय स्तरावर देखील घेणे त्यांचे प्रशिक्षण देणे ही काळाची गरज आहे. आपत्ती ही मानवी जीवनाशी निगडीतअसल्याने पुस्तकी ज्ञानाबरोबर जीवन जगताना येणा—या समस्याची जाणीव जागृती विद्यार्थ्यांना करून देणे गरजेचे व आवश्यक वाटते त्यामुळे शिक्षणाद्वारे आपत्ती निवारण व व्यवस्थापन करावे.

## संदर्भग्रंथ—

आपत्ती व्यवस्थापन संकल्पना आणि कृती — प्रा. व्ही जे. गोडबोले
कृतिबध्द आपत्ती व्यवस्थापन पी. पी. मराठे
गतिमान शिक्षणसाठी विचार प्रवाह — डॉ. निलिमा सप्रे, डॉ. प्रीती पाटील